सी एन आर नं. एम एच जी ए११-००००००८-२०१८
कि. फौ. मा. क्र. ०१/२०१८
विलास- वि. जन्म मृत्यू नोंदणी निंबधक
ग्रा.पं. नान्ही

-**आदेश**-
(नि.क्र १ खाली)
(पारीत दि.०१.०६.२०१८ रोजी)

१. अर्जदाराने सदरचा अर्ज या न्यायालयात कलम १३ (३) जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ अन्वये दाखल केला आहे. अर्जासोबत अर्जदाराने दाखल केलेले दस्तएवजांचे अवलोकन करण्यात आले. अर्जदारातर्फे ॲड. यु.एन.वालदे यांचा युक्तीवाद ऐकला.

२. अर्जदाराच्या मते त्यांची आजी श्रीमती राजीमबाई चतरु हुंडरा हीचा मृत्यू मौजा धमदीटोला येथे दि. ०३.०५.१९९४ रोजी झाला. अर्जदाराने त्याच्या आजीच्या मृत्युच्या नोंदीविषयी ग्राम पंचायत नान्ही कार्यालयात जाउन चौकशी केली असता, तिच्या नावाची मृत्यूची नोंद गैरअर्जदाराच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे सांगितले व तसे गैरअर्जदाराने त्यांना दि. २८.१२.२०१७ रोजी रितसर प्रमाणपत्र नि.क्र. १० दिले. अर्जदाराला शासकीय कामकाजा करण्याकरीता त्याच्या आजीच्या मृत्यूच्या प्रमाणपत्राची गरज असल्याने त्याने सदर अर्ज विद्यमान न्यायालयात दाखल केला.

३. प्रस्तुत प्रकरणी गैरअर्जदारास नोटीस काढले. गैरअर्जदारास नि.क्र. ०६ चे अहवलानुसार नोटीस तामिल होउन सुध्दा ते न्यायालयात हजर न झाल्याने मामला त्यांच्या विरुध्द एकतर्फा चालविण्यात आला. प्रस्तुत प्रकरणी दैनिक 'पुण्य नगरी' मध्ये दि. २३ जानेवारी २०१८ रोजी जाहिरनामा प्रकाशीत करण्यात आला. अर्जदाराने नि.क्र. ०९ वर स्वत:चा साक्षपुरावा दिला आहे. साक्ष पुराव्याचे अवलोकन केले. अर्जदाराने अभिलेखावर नि क्र ११ अन्वये दाखल केलेले दस्ताऐवजाचे अवलोकन केले.

४. अर्जदाराचे दैनिक वृत्तपत्र पुण्य नगरीमध्ये प्रकाशीत केलेल्या जाहीरनामा नि.क्र. ११ वर कोणीही उजर वा हरकत अभिलेखावर दाखल केलेली नाही तसेच अर्जदाराच्या कथनास व पुराव्यास कोणीही आव्हान दिलेले नाही. अर्जदाराच्या अर्जाच्या अनुषंगाने नि.क्र. ०९ अन्वये त्यांचा साक्ष

पुरावा, तसेच अभिलेखावरील उपलब्ध  दस्ताऐवज नि.क्र. ११ चे अवलोकन केले असता, असे सिध्द् होते की, अर्जदाराच्या आजीचा  मृत्यू दि. ०३/०५/१९९४ रोजी मौजा धमदीटोला, ता. कुरखेडा, जिल्हा- गडचिरोली  येथे झाला. परंतू त्याच्या आजीच्या मृत्यूची नोंद गैरअर्जदाराच्या कार्यालयात उपलब्ध नाही. अर्जदार त्याची आजी श्रीमती  राजीमबाई चतरु हुंडरा हिच्या मृत्यूच्या दिनांका पासून एक वर्षाच्या आत तिच्या मृत्यूची नोंद करण्यात आली नाही.  त्यामुळे कलम १३ (३) जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ च्या तरतुदीनुसार अर्जदार त्याच्या आजीच्या मृत्यूची नोंद गैरअर्जदाराच्या कार्यालयात करुन घेण्या विषयीचा आदेशास पात्र आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता मी खालील आदेश पारित करीत आहे.

- **<u>आदेश</u>** -

१. अर्ज मंजूर करण्यात येते.

२. निबंधक, जन्म मृत्यू  नोंदणी, ग्राम पंचायात नान्ही, ता.कुरखेडा, जिल्हा- गडचिरोली  यांना आदेश देण्यात येते की, अर्जदाराची आजी नामे  श्रीमती राजीमबाई चतरु हुंडरा हीचा मृत्यू दि. ०३/०५/१९९४ ची नोंद संबंधीत रजिस्ट्रमध्ये अर्जदाराने त्याकरीता लागणा-या विहीत फि चा भरणा केल्यानंतर करावी.

५.डंल.१८ ;बवचलद्ध

sd/-

दि. ०१.०६.२०१८

( एम. आर. बागडे)
न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.

कुरखेडा